**अति. महापालिका आयुक्त (ज) कार्यालय**
आस्थापना विभाग, पुणे महापालिका,
जावक क्र. : अमआ(ज)/उआसाप्र/आस्था/ ९३८९
दिनांक १०/०६/२०१५

## कार्यालय परिपत्रक

**विषय :** पुणे मनपाच्या सेवकांना देण्यात येणाऱ्या सवलतीच्या दरातील पीएमपीएमएल बस पास शिफारस व वितरणाबाबत.

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडून मासिक रक्कम रू. ७००/- या सवलतीचे दराची पीएमपीएमल संस्थेकडील बस पास सुविधा वापरणाऱ्या मनपा सेवकांचे एम्प्लॉयी क्रमांक, सेवकाचे नाव, हुद्दा, खात्याचे नाव, पास धारक सेवकाने प्रत्येक अर्थिक वर्षाचे एकूण १२ महिन्यामधील कीती महिने सवलतीचा पास घेतला आहे, त्यानुसार पुणे मनपाकडून अपेक्षित येणे रक्कम निश्चित करून पीएमपीएमएल संस्थेच्या योग्य त्या प्राधिकाऱ्याच्या सही, शिक्क्यासह उपलब्ध करून दिल्यानंतर मनपाकडून तपासणी करून देय रक्कम अदा करणे/शिफारस करणे आवश्यक आहे.

त्यानुषंगाने संबंधित मा. खाते प्रमुख, प्रशासन अधिकारी यांनी खालील प्रमाणे कार्यवाही करावी,

१) मनपा सेवकांना वार्षिक मोफत पीएमपीएमल बस पास पुरविणेचे स्वतंत्र धोरण असून मोफत पास देणेस मा.अति. महापालिका आयुक्त यांची मा. उप आयुक्त (सा.प्र.) यांचेमार्फत मंजूरी घेणे आवश्यक आहे.

खाते प्रमुख, प्रशासन अधिकारी यांचे शिफारशीने देण्यात येणाऱ्या सवलतीचे दराचे पीएमपीएमएल पास (मासिक रक्कम रू.७००/-) दराचे पासांची उर्वरीत (प्रती पास रू.८००/-) प्रमाणे होणारी रक्कम पुणे मनपाकडून पीएमपीएमएल संस्थेस आदा करण्यात येते, त्यानुषंगाने खाते प्रमुख, प्रशासन अधिकारी यांनी सवलतीचे दराचे पासासाठी केवळ शेड्युलमान्य पदावरील मनपा सेवकांची पीएमपीएमएल संस्थेकडे शिफारस करावी.

२) पीएमपीएमएल संस्थेकडे सवलतीचे दरातील बस पासासाठी सेवकांची शिफारस करताना मनपा सेवकांचे संपूर्ण नाव व एम्प्लॉयी क्रमांक, हुद्दा, रूजु दिनांक, सेवा निवृत्ती दिनांक, सेवक शेड्युलमान्य पदावरील आहे अगर कसे, दरमहाचे वेतन आदा करणाऱ्या कार्यालयाचे नाव व बिल क्र., शिफारस केलेला कालावधी हि सर्व माहिती संबंधित खाते प्रमुख/प्रशासन अधिकारी यांचे स्वाक्षरीने या परिपत्रकासोबतचे विहित नमुन्यात दयावी.

३) पीएमपीएमएल संस्थेने सेवकांची संपूर्ण नाव व एम्प्लॉयी क्रमांक, हुद्दा, रूजु दिनांक, सेवा निवृत्ती दिनांक, दरमहाचे वेतन आदा करणाऱ्या कार्यालयाचे नाव व बिल क्र., सेवकाने अर्थिक वर्षातील कीती माहिने पास घेतलेला आहे. याविषयी कागदपत्रे/माहिती संकलित करून त्याआधारेच सवलतीचे पासांपोटी देय रक्कमेची मागणी करावी. जेणेकरून देय रक्कम निश्चित करणे व एखादे प्रकरणी मनपा सेवकांचे वेतनातून रक्कम कपात करणे, याप्रमाणे कार्यवाही करता येईल.

४) दि.०१/०६/२०१५ पासून मनपा सेवक अनुदानीत रक्कम रू. ७००/- दराचे पासेस स्वारगेट डेपो येथील पास कार्यालय व मुख्यालय क्र.२ (पिंपरी) येथुन सोमवार ते शनिवार सकाळी ८ ते रात्रौ ७ व रविवारी

सकाळी ८ ते दुपारी १ या वेळेत वितरीत करण्यात येतील असे पीएमपीएमएल संस्थेकडून कळविण्यात आले आहे. तरी याबाबत पुणे महानगरपालिकेच्या सर्व सेवकांना खाते प्रमुख/प्रशासन अधिकारी यांनी अवगत करावे.

08/06

(राजेंद्र जगताप)
**अति. माहापालिका आयुक्त (ज)**
पुणे महानगरपालिका

प्रत/
सर्व मा. खाते प्रमुख
पुणे महानगरपालिका
यांजकडे माहिती आणि योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित-

(मंगेश जोशी)
**उप आयुक्त (सा.प्र.)**
पुणे महानगरपालिका

**सवलतीचे दराचे बस पाससाठी पीएमपीएमएलकडे दयावयाचे माहितीचा विहित नमूना**

| अ. क्र. | सेवकाचे संपूर्ण नाव व (एम्प्लॉयी कोड नं.) | हुद्दा | रूजू दिनांक | सेवा निवृत्ती दिनांक | शिफारस केलेले सेवक शेड्युलमान्य पदावर आहेत काय? | दरमहाचे वेतन आदा करणाऱ्या कार्यालयाचे नाव व बिल क्र. | अर्थिक वर्ष व शिफारस केलेले महिने |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | | ६ | ७ |
| १. | | | | | | | |
| २. | | | | | | | |
| ३ | | | | | | | |

(नाव व स्वाक्षरी)
**खाते प्रमुख/प्रशासन अधिकारी**
---------कार्यालय
पुणे महानगरपालिका